महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

मंगळवार ■ २५ नोव्हेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १५० ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

# बॉलिवूडचा 'ही-मॅन' धर्मेंद्र यांचे निधन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : आपल्या अप्रतिम अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात स्थान मिळवलेले बॉलिवूडचे दिग्गज अभिनेते धर्मेंद्र यांची आज (दि.२४) प्राणज्योत मालवली. ते ८९ वर्षांचे होते. गेल्या अनेक दिवसांपासून त्यांची प्रकृती खालावली होती. त्यामुळे त्यांच्यावर डॉक्टरांच्या देखरेखीखाली जुहू येथील राहत्या घरी उपचार सुरु होते. पण, अखेर त्यांची मृत्यूशी झुंज अपयशी ठरली. त्यांचे निधन होताच, अर्ध्या तासातच त्यांच्यावर विले पार्ले येथील पवनहंस स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचा मोठा मुलगा अभिनेता सनी देओलकडून त्यांना मुखाग्नी देण्यात आला. धर्मेंद्र यांच्या निधनाने मनोरंजन विश्वात तसेच त्यांच्या चाहत्यांमध्ये शोककळा पसरली असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

दोन आठवड्यांपूर्वी धर्मेंद्र यांची प्रकृती अचानक बिघडल्याने त्यांना मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. श्वास घ्यायला त्रास होत असल्याने त्यांना व्हेंटिलेटर सपोर्टवर ठेवण्यात आले होते. डॉक्टरांची एक टीम त्यांच्या प्रकृतीवर बारकाईने लक्ष ठेवून होती. त्यांचे



चाहते त्यांच्या स्वास्थ्यासाठी प्रार्थना करत होते. त्यावेळी त्यांच्या निधनाची अफवा पसरली होती. पण, आज मात्र बॉलीवूडचा 'ही-मॅन' अनंतात विलीन झाला आहे.

■ **धर्मेंद्र यांची संक्षिप्त कारकीर्द**

धर्मेंद्र यांचा जन्म ८ डिसेंबर १९३५ मध्ये झाला होता. त्यांनी १९६० मध्ये अभिनयक्षेत्रात पदार्पण केले. २०११ पर्यंत त्यांनी २४७ चित्रपटांमधून भूमिका साकारल्या. वैविध्यपूर्ण भूमिका साकारुन सिनेसृष्टीत त्यांच्या अभिनयाची छाप पाडली. 'शोले' सिनेमातील त्यांची भूमिका, हेमा मालिनी आणि त्यांची जोडी तसेच जय-वीरूची मैत्री आजही प्रेक्षकांच्या मनात अधिराज्य गाजवत आहे. शोले, चुपके चुपके, सीता और गीता, ड्रीम गर्ल, दी बर्निंग ट्रेन, मेरा नाम जोकर,अपने, लाइफ़ इन अ... मेट्रो, ओम शांती ओम, हम कौन हैं?, किस कीस की किस्मत यांसारख्या अनेक चित्रपटांत त्यांनी महत्त्वाच्या प्रमुख भूमिका साकारल्या होत्या. हिंदी चित्रपटसृष्टीतील ॲक्शन चित्रपटांमधील तडफदार भूमिका साकारल्याने 'ॲक्शन हीरो' अशी त्यांची ओळख होती. २०१७ मध्ये त्यांना पुण्याच्या यूएसके फाउंडेशनतर्फे जीवनगौरव पुरस्काराने गौरविण्यात आले होते.

■ **राजकारणात सहभाग**

मोठ्या पडद्यावर अधिराज्य गाजवणाऱ्या या अभिनेत्याने राजकीय आखाड्यात देखील आपले नशीब आजमावले. २००४ साली लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय जनता पक्षातर्फे निवडणूक लढवत ते राजस्थानच्या बिकानेरमधून निवडून आले होते.

### साधी जीवनशैली, नम्रता आणि मनमिळाऊ स्वभाव

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले की, "भारतीय सिनेमाच्या एका सुवर्णयुगाचा अंत धर्मेंद्रजींच्या निधनाने झाला आहे. ते केवळ एक दिग्गज चित्रपट व्यक्तिमत्त्व नव्हते, तर प्रत्येक भूमिकेला आपली वेगळी ओळख देणारे, विलक्षण प्रतिभावान अभिनेते होते. त्यांनी साकारलेल्या विविध भूमिका प्रेक्षकांच्या मनाला नेहमीच भावल्या." पुढे ते म्हणाले, "धर्मेंद्रजींची साधी जीवनशैली, नम्रता आणि मनमिळाऊ स्वभाव यासाठीही ते तितकेच आदरणीय होते. या दुःखद प्रसंगी माझ्या भावना त्यांच्या कुटुंबीय, मित्रपरिवार आणि असंख्य चाहत्यांसोबत आहेत. ॐ शांती."





# शहाड पुलाचे 'दुहेरी उद्घाटन'

## एकाच दिवशी दोन वेळा झालेल्या उद्घाटनामुळे संभ्रम आणि राजकीय कोंडी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर** : उल्हासनगर-कल्याण परिसरातील वाहतूककोंडी कमी करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जाणारा शहाड उड्डाणपूल अखेर पूर्णत्वास आला असला तरी त्याच्या एकाच दिवशी दोन वेळा झालेल्या उद्घाटनामुळे निर्माण झालेल्या राजकीय कोंडीची सुटका होताना दिसत नाही. शहाड उड्डाणपुलाचे अधिकृत उद्घाटन सोमवारी, २४ नोव्हेंबर रोजी सकाळी करण्याची योजना आधीच जाहीर करण्यात आली होती. मात्र भाजपने अचानक रविवारी दुपारीच कार्यक्रम जाहीर करून फित कापत उद्घाटनाचा सोहळा उरकला. काही तासांतच शिवसेना/टीओके गटानेही आपले स्वतंत्र उद्घाटन करून प्रतिउद्घाटनाचा 'शो' केला. एकाच पुलाचे एका दिवसात दोनवेळा उद्घाटन झाल्याने नागरिकांमध्ये नेमका अधिकृत सोहळा कोणता? याबाबत संभ्रम निर्माण झाला.

शहाड उड्डाणपुलामुळे वाहतुकीला दिलासा मिळणार हे निश्चित असले तरी सध्या पुलावर प्रत्यक्ष वाहतूक कमी आणि श्रेयवादासाठीची राजकीय वाहतूककोंडी अधिक दिसत आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या प्रकल्पावरून राजकीय तापमान किती वाढते, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. श्रेयवादाचे राजकारण की विकासाचा सोहळा? आमदार कुमार आयलानी यांच्या कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार नियोजित कार्यक्रमानुसार सोमवारी सकाळी पुलाचे उद्घाटन करण्यात येणार आहे. यामुळे राजकीय वातावरणात आणखी धुरळा उडणार हे निश्चित.

# भाजपचं स्वबळात 'कल्याण ?'

## प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाणांचा सूचक इशारा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण:** रविवारी डोंबिवलीत मनसे नगरसेवकाच्या प्रभागात विकासकामांचा शुभारंभ करताना भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी पालिका निवडणुकीत महायुतीला मतदान करा, असे आवाहन करण्याऐवजी, 'कामे मार्गी लावण्यासाठी कमळ चिन्हावर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराला मतदान करा, केंद्र आणि राज्याप्रमाणे महापालिकेत भाजपचे सरकार आले तर अनेक गोष्टी सहजपणे मार्गी लावता येतील', असे आवाहन करत महापालिका निवडणुकीसाठी स्वबळाचा नारा दिला.

मागील अनेक दिवसांपासून मित्रपक्षांमध्ये सुरू असलेल्या धुसफुशीनंतर आता भाजपमधून शिवसेनेत प्रवेश केलेल्या नगरसेवक विकास म्हात्रे यांना खिंडीत गाठण्यासाठी चव्हाण यांनी त्यांच्याच प्रभागात 'शतप्रतिशत भाजप'चे आवाहन केले.

गेली दहा वर्षे भाजपच्या चिन्हावर निवडणूक लढविणाऱ्या म्हात्रे यांनी चव्हाण यांच्याकडून आपल्याला निधी देण्यात हात आखडता घेतला जात असल्याने प्रभागातील विकासकामे रखडल्याचे सांगत नाराजी व्यक्त केली होती. यानंतर म्हात्रे यांनी शिवसेनेत प्रवेश करताना चव्हाण यांच्यावर थेट आरोप केले होते. यांनतर आता याच भागातील मनसेचे नगरसेवक प्रकाश भोईर, सरोज भोईर यांच्या प्रभागातील विकासकामांचे भूमिपूजन केले. यावेळी बोलताना त्यांनी प्रभागात विकासासाठी निधी दिल्यानंतरही ही कामे जाणीवपूर्वक रखडवल्याचा आरोप केला. 'ज्याप्रमाणे विधानसभेत भरभरून मतदान करता, त्याप्रमाणे पालिका निवडणुकीत कमळ चिन्हावर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराला मतदान करा आणि हक्काची कामे करून घ्या', असे सांगत म्हात्रे यांच्यासह शिवसेनेला उघड आव्हान दिले.

आपल्याला १०० टक्के एका विचाराचे म्हणजेच भारतीय जनता पार्टीचे सरकार जे केंद्रात आणि राज्यात आहे तेच आणायचे आहे, असे सांगत पालिका निवडणुकीत महायुती होणार नसल्याचे उघड संकेत दिले. यापूर्वी अनेकदा महापौर भाजपचा म्हणत पदाधिकाऱ्यांनी महायुतीला विरोध केला असताना शिवसेनेने कायमच मवाळ भूमिका घेत महापौर महायुतीचा असेल असे नमूद करून पक्षवाढीवर भर दिला होता. मात्र आता शिवसेनेचे अनेक मोहरे भाजपच्या गळाला लागल्याने दोन्ही पक्ष इरेला पेटले आहेत.


दरम्यान, डोंबिवली पश्चिमेकडील मनसेचे माजी नगरसेवक प्रकाश भोईर आणि सरोज भोईरही लवकरच भाजपच्या घोषणा देतील, असे म्हणत त्यांच्या पक्षप्रवेशाचे चव्हाण यांनी संकेत दिले.

# उमेदवारी आणि जागावाटपावरून उबाठा आणि मनसेत नाराजीचा सूर !

## मनसेचे उमेदवारही उबाठाच्या मशाल चिन्हावर !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे : शिवसेना आणि भाजपच्या उमेदवारांच्या विरोधात अंबरनाथमध्ये शिवसेना (उबाठा) आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांनी युती करीत लढण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र विरोधकांना रोखण्यासाठी एकत्र आलेल्या युतीत निवडणुकीपूर्वीच धुसफूस सुरू झाल्याचे बोलले जात आहे. लोकसभा, विधानसभा निवडणुकीत शिवसेने विरोधात लढणाऱ्या उबाठाच्या निष्ठावंताना डावलत त्या प्रभागात मनसेच्या उमेदवारांना प्राधान्य देत उमेदवारी दिल्यावरून उबाठा आणि मनसेतही नाराजीचा सूर पाहायला मिळत आहे.**



अंबरनाथ नगरपालिका निवडणुकीत यंदा युती, आघाडीतील बिघाडीने अनेक पक्ष स्वबळावर निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. त्यात शिवसेना, भाजप यांच्यात खरी लढत होणार असली, तरी युतीतील राष्ट्रवादी आणि मविआतील काँग्रेसही नगराध्यक्षपदाच्या रिंगणात उतरली आहे. तर दुसरीकडे मविआतील शिवसेना उबाठा, मनसे आणि राष्ट्रवादी (शप) यांनी युती करत उबाठाचा उमेदवार नगराध्यक्षपदी दिला आहे. मात्र निवडणुकीपूर्वीच मविआत शिवसेना (उबाठा) आणि मनसेत काही ठिकाणी जागा वाटपावरून धुसफूस सुरू असल्याचे बोलले जात आहे.

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत शिवसेनाच्या (उबाठा) निष्ठावंतानी शिवसेनेविरोधात लढाई लढली होती. त्यामुळे उबाठाचे अनेक पदाधिकारी पालिका निवडणुकीच्या रिंगणात उतरण्यास इच्छुक होते. मात्र शिवसेनाकडून(उबाठा) ३५ तर मनसेकडून ११ उमेदवार देण्यात आले असून मनसेचे उमेदवारही उबाठाच्या मशाल चिन्हावर निवडणूक लढवत आहेत. मात्र उमेदवारी देताना काही ठिकाणी उबाठाच्या पदाधिकाऱ्यांना डावलून मनसेच्या उमेदवारांना प्राधान्य दिल्याने नाराजी पसरल्याचे बोलले जात आहे.

# गाफील राहिलो तर ; 'येणारी पालिका निवडणूक शेवटची असेल - राज ठाकरे

## राज ठाकरे यांची कार्यकर्त्यांना भावनिक साद

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

राज्यात आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आतापासूनच सर्वच राजकीय पक्षांनी जोरदार तयारी सुरू केल्याचं दिसून येत आहे. यातच काही नगरपंचायती आणि नगरपरिषदेच्या निवडणुकीची रणधुमाळी सध्या सुरू आहे. त्यामुळे सत्ताधारी आणि विरोधक आमने-सामने आल्याचं पहायला मिळत आहे. दरम्यान, आगामी मुंबई महापालिकेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने सर्वच राजकीय नेते मंडळी आपआपल्या कार्यकर्त्यांकडून कामाचा आढावा घेत कार्यकर्त्यांना कानमंत्र देत आहेत. याच पार्श्वभूमीवर मनसेचे प्रमुख राज ठाकरे यांनी कोकण महोत्सवातून मनसैनिकांशी संवाद साधताना एक मोठं भाष्य केलं आहे. 'येणारी मुंबई महापालिकेची निवडणूक ही शेवटची असेल, जर आपण गाफील राहिलो तर ही निवडणूक हातातून गेली म्हणून समजा', असं म्हणत राज ठाकरे यांनी कार्यकर्त्यांना कामाला लागण्याचे आदेश दिले आहेत.

**थोडे दिवस थांबा, आता भाषणं सुरूच होतील. आज आपल्या कोकण महोत्सवाचं ११ वं वर्ष साजरं होत आहे. या कोकण महोत्सवाला सर्वांचा आशीर्वाद लाभतो आहे. त्याबाबत सर्वांचे आभारच. मला आज फक्त एवढी एकच गोष्ट सांगायची आहे की रात्र वैऱ्याची आहे, त्यामुळे गाफील राहू नका. आपल्या आजूबाजूला लक्ष ठेवा. आता ज्या प्रकारचं राजकारण सुरू आहे आणि मुंबईवर ज्या प्रकारे डोळा ठेवला जात आहे, मतदार याद्यांच्या माध्यमातून जे राजकारण सुरू आहे, त्यावर तुम्ही लक्ष ठेवा, असा कानमंत्र राज ठाकरे यांनी कार्यकर्त्यांना दिला आहे.**

## लक्षवेधी

### अर्णव खैरेचा मोबाईल फॉरेन्सिक प्रयोगशाळेत पाठविणार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** - लोकल प्रवासात असताना मराठी बोलला नाही म्हणून एका टोळक्याने बेदम मारहाण केल्याने मानसिक तणावाखाली आलेल्या कल्याणमधील रहिवासी अर्णव खैरे (१९) या महाविद्यालयीन विद्यार्थ्याने गेल्या आठवड्यात राहत्या घरी गळफास घेत आत्महत्या केली. या गुन्ह्या प्रकरणात अर्णवचा मृत्यू नेमका कोणत्या कारणाने झाला याचा अधिकचा तपास करण्यासाठी अर्णवचा मोबाईल फॉरेन्सिक प्रयोगशाळेत पाठविण्याचा निर्णय वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी घेतला आहे. तसेच, अंबरनाथ-सीएसएमटी लोकलमध्ये अर्णव खैरेला ज्या चार ते पाच प्रवाशांच्या टोळक्याने मराठी बोलता येत नाही म्हणून बेदम मारहाण केली. त्या प्रवाशांची ओळख पटविण्याचे काम कोळसेवाडी पोलिसांनी सुरू केले आहे. कोळसेवाडी पोलीस, रेल्वे पोलीस, रेल्वे सुरक्षा जवान यांच्या संयुक्त कार्यवाहीतून हा तपास केला जात आहेत. अंबरनाथ ते ठाणे प्रवासा दरम्यान टोळक्याने अर्णव खैरेला बेदम मारहाण केली होती.

### आनंद दिघे उड्डाण पुल ४ डिसेंबर पर्यंत बंद

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** – कल्याण पूर्व पश्चिम भाग जोडणाऱ्या दिवंगत आनंद दिघे उड्डाण पुलावरील रस्त्यावर डांबरीकरणाच्या पुनर्पृष्ठीकरणाचे काम करण्यात येणार आहे. या कामासाठी २५ नोव्हेंबर ते ४ डिसेंबर या कालावधीत पूल वाहतुकीसाठी पूर्ण बंद ठेवण्यात येणार आहे. वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त पंकज शिरसाट यांनी या पूल आणि वाहतूक बंदबाबतची शनिवारी अधिसूचना काढली आहे.

मागील काही दिवस शहाड उड्डाण पूल देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी बंद होता. त्यामुळे कल्याण शहरातील, मुरबाड, उल्हासनगर, कल्याण पूर्व भागात प्रवाशांचे, वाहन चालकांचे प्रचंड हाल झाले. कल्याण शहर परिसर या पूल बंदमुळे दररोज वाहन कोंडीने गजबजलेला असायचा. आता शहाड उड्डाण पूल वाहतुकीसाठी खुला झाल्यानंतर कल्याण पूर्व पश्चिम जोडणारा दिवंगत आनंद दिघे उड्डाण वाहतुकीसाठी बंद राहणार आहे. त्यामुळे प्रवाशांचे खूप हाल आणि परिसरात वाहतूक कोंडी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### कल्याण-लोणावळा विभागात ब्लॉक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : मध्य रेल्वेच्या लोणावळा-बीव्हीटी यार्ड तसेच कल्याण-लोणावळा विभागातील अप यार्डमध्ये प्री नॉन-इंटरलॉकिंग आणि नॉन-इंटरलॉकिंग कामासाठी २६ नोव्हेंबर ते ६ डिसेंबर या कालावधीत विशेष ब्लॉक घेण्यात आला आहे. या कामामुळे मेल एक्स्प्रेस गाड्यांच्या वेळापत्रकावर परिणाम होणार आहे. ब्लॉक कालावधीत लोणावळा–बीव्हीटी यार्डमधील यार्ड पुनर्रचना व इतर पायाभूत कामे हाती घेण्यात आली आहेत. २६ आणि २७ नोव्हेंबर रोजी सकाळी ११.२५ ते सायंकाळी ६.२५ वाजेपर्यंत घेण्यात आलेल्या ब्लॉकमुळे जोधपूर-हडपसर एक्स्प्रेस कर्जत येथे ४५ मिनिटांसाठी थांबवण्यात येणार आहे. तर सीएसएमटी-चेन्नई एक्स्प्रेस लोणावळा येथे एक तास, एलटीटी-मदुराई एक्स्प्रेस भिवपुरी रोड येथे १० मिनिटे, सीएसएमटी-भुवनेश्वर कोणार्क एक्स्प्रेस, सीएसएमटी-हैदराबाद एक्स्प्रेस लोणावळा येथे १० ते १५ मिनिटे थांबवण्यात येणार आहे. तसेच २७ नोव्हेंबर रोजी एलटीटी-काकीनाडा एक्स्प्रेस भिवपुरी रोड येथे १० मिनिटे थांबवण्यात येईल. २८ आणि २९ नोव्हेंबर रोजी सीएसएमटीवरून सुटणारी सीएसएमटी-होस्पेट एक्स्प्रेस उशिरा सुटेल. त्याचप्रमाणे २९ नोव्हेंबर रोजी मदुराई-एलटीटी अतिजलद एक्स्प्रेस एलटीटी १० ते १५ मिनिटे उशिरा पोहोचेल.

### देसाई खाडी पुलाखाली सुटकेसमध्ये सापडला तरूणीचा मृतदेह

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली** - कल्याण शिळफाटा रस्त्यावरील देसाई खाडी पुलाखाली नदी पात्राच्या काठाला एका २५ ते ३० वर्षाच्या तरूणीचा सुटकेसमध्ये मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. सोमवारी दुपारी या पुलावरून जाणाऱ्या काही पादचाऱ्यांना हा मृतदेह निदर्शनास आला. शीळ डायघर पोलिसांना याप्रकरणाची माहिती देण्यात आली. पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. या तरूणीला अन्य ठिकाणी मारून रात्रीच्या वेळेत देसाई खाडी किनारी आणून टाकले असावे असा अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे.

JEEVANDEEP SHAIKSHANIK SANSTHA POI'S
ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE GOVELI
Tal. Kalyan, Dist- Thane 421103
Permanently Affiliated to University of Mumbai
NAAC Reaccredited "B" Grade
Admission started for Arts, Commerce, Science & Professional Courses
2025-26 ADMISSION OPEN
UNDER GRADUATE
B.A.: Marathi, English, Economic, History, Sociology, Geography, Political Science
B.Com: General
B.Com: Account & Finance
B.Sc.: Chemistry
B.Sc.: Maths
B.Sc.: Information Technology
B.Sc.: Data Science
B.A.M.M.C.: Mass Media
B.M.S.: Management Studies
POST GRADUATE
M.A.: Marathi, History, Sociology, Economic, Geography
M.Com.: Advanced Accountancy
M.Sc.: Chemistry Organic
M.Sc.: Analytical
M.Sc.: Information Technology
M.A. C & J: Mass Media
ज्ञानगंगा घरोघरी
Y.C.M.O.U. COURSES
M.Sc. (Chemistry) M.A. - Yoga
DCM - Diploma in Co-operative Management
DCA - Diploma in Computer Applications
B. lib - Library Science
MBA - In H. R., Finance, Production, Marketing
SKILL DEVELOPMENT COURSE
DMLT
Fire & Safety
Construction Supervisor
Photography
Yoga Teacher Training GDA
Nursing Course,
Tally
Tailoring,
English Speaking
Advance Beautician
Social Media
Incubation & Innovation Center
For more information : 7021995158 I 8108559566
Email - goveli_jssp@rediffmail.com
website :www.jeevandeepcollegegoveli .in

रामायु पंचकर्म हॉस्पिटल व वेलनेस सेंटर
"आपल्या आरोग्याचा नैसर्गिक मार्ग – आमच्या आयुर्वेद रुग्णालयात!"
आमच्याकडे उपलब्ध सेवा
पंचकर्म चिकित्सा
आयुर्वेदिक औषधोपचार
जीवनशैली सल्ला (Ahar-Vihar मार्गदर्शन)
डिटॉक्स थेरपी
स्त्रीरोग व प्रसूती उपचार
त्वचारोग व संधिवात उपचार
डायबेटीस व स्थूलता नियंत्रण
मानसिक आरोग्य सुधारणा
आमची वैशिष्ट्ये
नैसर्गिक व शुद्ध औषधोपचार
स्वच्छ व शांत उपचार कक्ष
रोगमुक्ती आणि आरोग्य संवर्धनासाठी विशेष कार्यक्रम
आता आयुर्वेद उपचार आपल्या टिटवाळ्यात
9920377799
ईमेल: ramayupanchakarma@gmail.com
डॉ.प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (B.A.M.S, M.D Ayurveda)
संपर्क करा : पत्ता: रामायु पंचकर्म हॉस्पिटल व वेलनेस सेंटर, साईबाबा मंदिर रोड, महागणपती मंदिराजवळ, टिटवाळा (पु.)

# अभिनेता धर्मेंद्र यांना तैलचित्र माध्यमातून श्रद्धांजली



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : अभिनेते धर्मेंद्र यांचे वयाच्या 89 व्या वर्षी दुःखद निधन झाल्याने सिने क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झालेली आहे. अशा या ज्येष्ठ हि मॅन अभिनेत्याला कल्याण मधील वाणी विद्यालयातील कला शिक्षक यश महाजन यांनी तैल रंग माध्यमात चित्र रेखाटून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली व्यक्त केली. चित्र रेखाटायला महाजन यांना दोन ते अडीच तास अवधी लागला.

# राज्यस्तरीय कुराश (मार्शल आर्ट) स्पर्धेत माविया मेमनला सुवर्णपदक!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**शहापूर ग्रामीण** : क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, व जिल्हा क्रीडा अधिकारी मुंबई अंतर्गत विभागस्तरीय शालेय कुराश (मार्शल आर्ट) स्पर्धा दिनांक 22/11/2025 भारतरत्न राजीव गांधी क्रीडा संकुल धारावी येथे पार पडल्या सदरच्या या स्पर्धेत शारदा इंग्लिश मीडियम स्कूल ची इयत्ता सातवी मध्ये शिकणारी 1) माविया मेमन, 14 वर्ष वयोगट मध्ये सुवर्ण पदक मिळविले तर धृती प्रदीप हालके, हंसिका पाटील वैष्णवी महाजन यांना रौप्य पदक मिळाले या धवल यशाने शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला असून मविया मेनन हिने विभाग स्तरीय कुराश स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविल्याने तिची राज्य स्तरावर निवड झाली आहे या यशस्वी विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक दौलत चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले, वरील सर्व विद्यार्थीनी व शिक्षक यांचे विद्या विकास मंडळाचे चेअरमन विठ्ठल सातवी सेक्रेटरी रवींद्र शेलार यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या तसेच प्राचार्य प्रशांत जाधव यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे व क्रीडा शिक्षक यांचे कौतुक केले.

### ज्युनिअर नॅशनल चॅम्पियनशिपमध्ये हर्डल्स शर्यतीत

# ठाण्याच्या साईशा पवारने पटकाविले 'रजत पदक'

दै.ठाणेजीवनदीपवार्ता



**ठाणे** : ठाण्याची उदयोन्मुख क्रीडापटू साईशा विशाल पवार (वय 15) हिने राष्ट्रीय स्तरावर नेत्रदीपक कामगिरी करत ठाणे जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. नुकत्याच ओडिशातील भुवनेश्वर येथील कलिंगा स्टेडियममध्ये पार पडलेल्या ज्युनिअर नॅशनल चॅम्पियनशिपमध्ये सायेशाने अडथळा शर्यतीत (Hurdles) रजत पदक पटकाविले आहे.

साईशा ट्रायथलॉन, पेंटाथलॉन आणि हर्डल्स या क्रीडा प्रकारांत प्रावीण्य मिळवत आहे. तिने आतापर्यंत चार वेळा राष्ट्रीय स्तरावर सहभाग घेतला आहे. या राष्ट्रीय पदकापूर्वी, साईशाने जिल्हा आणि राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये पेंटाथलॉन आणि हर्डल्स शर्यतीत सुवर्णपदके जिंकून आपली प्रतिभा सिद्ध केली आहे.

याविषयी आपल्या भावना व्यक्त करताना साईशा म्हणाली की, या यशामागे माझे प्रशिक्षक दर्शन देवरुखकर आणि सदाशिव पांडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. प्रशिक्षकांच्या अचूक मार्गदर्शनामुळेच मला हे यश मिळविता आले. या प्रवासात माझ्या कुटुंबाचाही मोठा पाठिंबा आहे. माझे आई-वडील आणि आजी-आजोबा यांच्यासह माझी 90 वर्षांची पणजी सरला पत्रुटकर ही प्रत्येक यशानंतर माझी पाठ थोपटून प्रोत्साहन देतात तेव्हा कुटुंबाचा हा भक्कम आधार माझ्यासाठी नेहमीच प्रेरणादायी ठरतो.

भविष्यातील ध्येयाबद्दल बोलताना साईशा म्हणाली, भविष्यातही मी अशीच मेहनत करीत राहीन आणि भारताचे प्रतिनिधित्व करेन. ऑलिम्पिकमध्ये देशाचा अभिमान वाढेल, अशी कामगिरी करण्याचे माझे स्वप्न आहे. साईशा पवारच्या या कामगिरीबद्दल तिचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे आणि तिच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# जेष्ठ नागरिकास महिना 7 हजार रुपये मानधन महाराष्ट्र शासन देणार

## - डॉ.जयपाल पाटील



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : महाराष्ट्रातील जेष्ठ नागरिकांची संख्या वाढत असून त्याच्या साठी महाराष्ट्र शासनामार्फत विविध योजना बाबत दिनांक 15जुलै 2025 रोजी विधेयक मंजूरीचे राजपत्र प्रसिद्ध केले आहे. याबद्दल महाराष्ट्रातील जेष्ठ नागरिक संघटना,समाज सेवक पंतप्रधान मा.नरेंद्र मोदी आणी महाराष्ट्र मुख्य मंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करीत आहेत. या योजना मिळविण्यासाठी वयाची 65 वर्ष पुर्ण झाली असतील त्याचे भारत सरकारचे अथवा महाराष्ट्र शासनाचे जेष्ठ नागरिक ओळखपत्र शासनाच्या ईसेवा केंद्रात काढावे असे मार्गदर्शन अलिबाग जेष्ठ नागरिक संघटनेच्या मासिक बैठकीत जेष्ठ पत्रकार प्रा. डॉ.जयपाल पाटील यांनी सांगितले. यावेळी अध्यक्ष श्री.प्रफुल्ल राऊत व उपाध्यक्षा सौ.चारुशिला कोरडे व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्रा.डॉ.जयपाल पाटील म्हणाले ज्या जेष्ठ नागरिकास कोणतीही पेन्शन मिळत नाही,त्याना आता दरमहा रु.7000/-मिळणार असुन,महाराष्ट्रातील पर्यटन स्थळे, मंदिरे पाहण्यास वर्षाला रु.15000/-अनुदान मिळणार असून, निराधार जेष्ठाना राहण्याची व जेवणाची सोय मोफत महाराष्ट्र शासन करणार आहे. केंद्र सरकारने 70वर्षावरील जेष्ठांना रेल्वे प्रवास 50 टक्के सवलत तर महाराष्ट्र राज्य परिवहन कडून एस.टी.प्रवास 50 टक्के सवलत त्याच बरोबर मालमत्ता करात 30 टक्के सवलत देण्यात येणार आहे.आरोग्य समस्या साठी सरकारी रुग्णालयात मोफत उपचार आहेतच, सोबत खाजगी रुग्णालयात शस्त्रक्रिया साठी रु.5लाख मिळणार आहेत. यासाठी प्रत्येक जेष्ठ नागरिकांनी केंद्र अथवा महाराष्ट्र शासनाचे ओळखपत्र काढणे आवश्यक आहे, यामधे सरकारकडून 3 विभागात कार्डाची आखणी केली असुन वय वर्ष 80 वर सुपर कार्ड,वय 70 च्या वर मध्यम कार्ड आणी 65वर्षावरील सर्व योजना प्राप्त होणार असे डॉ.जयपाल पाटील यांनी सांगितले.व कोणतीही आपत्ती आल्यावर रायगडचा युवक फाउंडेशनला संपर्क साधून सेवा करण्याची संधी द्यावी असे सांगितले. यावेळेस संघटनेचे सचिव श्री.नंदु तळकर ,सहसचिव श्रीमती मेघना कुलकर्णी,खजिनदार प्रणिता वर्तक, श्री.आर.के.घरत,कार्यकारिणी सदस्य व ईतर सभासद उपस्थित होते.

# लोकमान्य नगर परिसरात डीप क्लिनिंग ड्राइव्हच्या माध्यमातून परिसर झाला स्वच्छ

दै.ठाणेजीवनदीपवार्ता



**ठाणे** : लोकमान्य सावरकर नगर प्रभाग समिती अंतर्गत परिसर स्वच्छ व रोगमुक्त ठेवण्याच्या उद्देशाने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे सूचनेनुसार व ठामपा आयुक्त सौरभ राव यांच्या आदेशानुसार उपायुक्त मधुकर बोडके आणि आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली व्यापक डीप क्लिनिंग ड्राइव्ह उपक्रम अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने दि.22 नोव्हेंबर 2025 रोजी पार पडला.

स्वच्छता मोहिमेचे निरीक्षण प्रभाग समितीचे मुख्य स्वच्छता निरीक्षक शयुराज कांबळे, तसेच उपमुख्य स्वच्छता निरीक्षक मारुती कवळे, राजेश वळवी, प्रवीण बनोटे, हेमंत चौधरी यांनी केले. स्वच्छता निरीक्षक सुभाष जमदाडे, प्रदीप मोते, मुकेश नेसवणकर, अमोल अमृतकर, समीर डोळे, गायकर, प्रवीण खांबे, प्रशांत खांबे, गाडेकर यांच्यासह संपूर्ण सफाई कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. यावेळी ड्रेनेज लाइन साफसफाई, रस्त्यांची स्वच्छता, कचरा उचल, धूळ व दुर्गंधी निर्मूलन अशा विविध कामांचा या ड्राईव्हमध्ये समावेश होता. नागरिकांकडूनही या उपक्रमाचे कौतुक करण्यात आले असून परिसर स्वच्छतेबाबत जागरूकता वाढवण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे. पुढील काळातही अशाच स्वच्छता मोहिमा राबवण्याचा संकल्प व्यक्त केला आहे.

# ठाणे येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे:** श्री गुरुदत्त सेवा मंडळ (रिजि)व श्री गुरुदत्त उत्सव कमिटी यांचे संयुक्त विद्यमाने श्री दत्तगुरु जयंती उत्सवानिमित्ताने हभप नाना महाराज काकडेयांचे मार्गर्शनाखाली दि.28 नोव्हेंबर ते 05 डिसेंबर 2025 या कालावधी मध्ये श्री दत्त मंदिर, इंदिरा नगर, वागळे इस्टेट, ठाणे येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी दिप प्रज्वलन मा. नगरसेवक, विभाग प्रमुख एकनाथ भोईर, मा. नगरसेविका एकता भोईर, विनापुजन मा. जेष्ठ नगरसेवक हनमंत जगदाळे, घटस्थापना मा. नगसेवक योगेश जाणकर, ज्ञानेश्वरी पूजन शशिकांत दौंड,ध्वजारोहण ऋषिकेश पाटील, ज्ञानेश्वरी मूर्ती पूजन उद्योजक गजानन आंधळे यांचे हस्ते करण्यात येणार आहे.

साप्ताहिक दैनंदिन कार्यक्रमामध्ये पहाटे 4 ते 6 वाजता काकड आरती, सकाळी 7 ते 10 वाजता ग्रंथराज ज्ञानेश्वरी सामुदायीक पारायण, सायंकाळी 5 ते 6 वाजता हरिपाठ व रात्री 8 ते 10 वाजता जाहिर हरि किर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. दि.5 डिसेंबर रोजी सकाळी 8 ते 10वा. ह.भ.प. तुळशीराम महाराज काकडे यांचे काल्याचे किर्तन होईल. त्यानंतर नगरप्रदक्षिणा व महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. तरी परिसरातील भाविकांनी भजन, किर्तन, पारायण, संगित भावार्थ रामायण या विविध कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री गुरुदत्त सेवा मंडळाचे अध्यक्ष आनंद पाटील यांनी केले आहे.

# समुपदेशन केंद्र - ही काळाची गरज!

## महापालिका आयुक्त अभिनव गोयल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता




समुपदेशन केंद्र ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी आज केले, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने आणि वुमन्स वेल्फेअर फाउंडेशन या एनजीओच्या मदतीने कल्याण पश्चिम येथील चिकणघर परिसरात उभारण्यात आलेल्या समुपदेशन केंद्राच्या शुभारंभ समयी बोलताना त्यांनी हे प्रतिपादन केले.

शहरातील दुर्बल घटकांसाठी महापालिकेमार्फत विविध योजना राबविल्या जातात.मुली,जेष्ठ नागरिक, महिला यांना घर ,कार्यालय इ. ठिकाणी उद्भवणाऱ्या समस्या मांडण्यासाठी समुपदेशन केंद्राच्या माध्यमातून एक व्यासपीठ उपलब्ध होणार असल्याची माहिती आयुक्त अभिनव गोयल यांनी यावेळी दिली. आरोग्यदायी आणि संतुलित सोसायटीसाठी समुपदेशन केंद्राची मदत होणार असून या समुपदेशन केंद्राचा लाभ जास्तीत जास्त नागरिकांनी घ्यावा असे आवाहन आयुक्तांनी यावेळी केले. त्याचप्रमाणे दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी तणाव मुक्ती शिबिरांचे आयोजनही करावे अशा सूचना आयुक्त अभिनव गोयल यांनी यावेळी संबंधितांना दिल्या.

सध्याच्या युगातील बदलत्या कौटुंबिक व्यवस्थेमुळे अनेक समस्या उद्भवतात त्यावेळी अशा समुपदेशन केंद्राची निकड लक्षात येते असे मत महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे यांनी यावेळी व्यक्त केले.

कल्याण पश्चिम येथील चिकणघर परिसराव्यतिरिक्त मोहन खेडा- मोहने, सप्तगिरी- कल्याण पूर्व, पेंडसे नगर डोंबिवली- पूर्व आणि आनंद नगर -डोंबिवली पश्चिम या परिसरातही समुपदेशन केंद्र सुरू करण्यात येत असून महापालिका शाळां मधील विद्यार्थ्यांकरिता कल्याण साठी व डोंबिवली विभागासाठी प्रत्येकी एका समुपदेशकाची नेमणूक करण्यात आल्याची माहिती महिला व बालकल्याण विभागाच्या उपायुक्त कांचन गायकवाड यांनी यावेळी दिली. या समुपदेशन केंद्रात एक समुपदेशक व आवश्यकतेनुसार लिगल अडवायझरचे सहकार्य नागरिकांसाठी उपलब्ध राहील अशी माहिती वुमन्स वेल्फेअर फाउंडेशन च्या अध्यक्षा मीनाक्षी उज्जैनकर यांनी या कार्यक्रमात दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रोजेक्ट डायरेक्टर आरती बनसोडे यांनी केले .या समयी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे, उपायुक्त कांचन गायकवाड, संजय जाधव, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपा शुक्ला ,वैद्यकीय अधिकारी डॉ. टिके, डॉ. पौर्णिमा ढाके, समाज विकास अधिकारी प्रशांत गवाणकर , कल्याण मधील जेष्ठ नागरिक समन्वय समितीचे अध्यक्ष कोसूळकर, इतर मान्यवर तसेच नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.




### केडीएमसीच्या प्रबोधनकार ठाकरे शाळेत

# 'हेपिटायटिस - ए' मोफत लसीकरण मोहिमेचा शुभारंभ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : महापालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभाग, शिक्षण विभाग व महिला व बालकल्याण विभाग यांचेमार्फत महापालिका आयुक्त यांच्या उपस्थितीत आज कल्याण पूर्व नेतिवली येथील प्रबोधनकार ठाकरे प्राथमिक शाळा क्रमांक 19 येथे हेपिटायटिस - A या मोफत लसीकरण मोहिमेस आज प्रारंभ करण्यात आला.

महापालिका शाळांमधील इयत्ता पहिली ते आठवीतील मुलांना ही लस मोफत देण्यात येणार असून यकृतावर होणारा दुष्परिणाम टाळण्यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून ही लस मोफत देण्यात येत असल्याची माहिती आयुक्त अभिनव गोयल यांनी यावेळी दिली तसेच शाळांमधील शिक्षकांनी आपल्या विद्यार्थ्यांच्या लसीकरणासाठी पालक मेळावा घेऊन या लसीचे महत्त्व त्यांना विषद करावे असेही प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. प्रबोधनकार ठाकरे प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांशी संवाद साधताना आपली स्वप्ने पूर्ण करण्यासाठी अभ्यास करावा तसेच अभ्यासाव्यतिरिक्त इतर कलागुणही जोपासावेत असे मार्गदर्शन आपल्या भाषणात केले.

कावीळ सारखा दूषित पाणी आणि दूषित अन्न यातून उद्भवणारा विषाणूजन्य आजार प्रतिबंधक हेपिटायटिस ए हे लसीकरण करण्यात येत असून विद्यार्थ्यांनी स्वच्छतेच्या सवयी कटाक्षाने पाळणे आवश्यक आहे असे प्रतिपादन महापालिकेच्या वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉक्टर दीपा शुक्ल यांनी आपल्या भाषणात केले. हेपिटायटीस ए या लसीकरणाचे दोन डोस विद्यार्थ्यांनी घ्यावयाचे असून पहिल्या लसीकरणानंतर सहा महिन्यांनी दुसरा डोस घ्यावयाचा आहे तसेच महापालिकेच्या इतर शाळांमध्ये देखील पालकांच्या संमतीअंती हे लसीकरण करण्यात येणार असल्याची माहिती डॉ. दीपा शुक्ल यांनी यावेळी दिली.

या समयी पालिका उपायुक्त कांचन गायकवाड, संजय जाधव ,वैद्यकीय अधिकारी डॉ. पूर्णिमा ढाके, डॉ. दिपाली मोरे, प्रशासन अधिकारी भारत बोरनारे, समाज विकास अधिकारी प्रशांत गवाणकर, इतर अधिकारी वर्ग, शाळेतील शिक्षक - विद्यार्थी उपस्थित होते.

# श्वान निर्बीजीकरण केंद्रात घाणीचे साम्राज्य

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर:** बदलापूर पूर्वकडील पनवेल हायवे परिसरात असलेल्या नगरपालिकेच्या श्वान निर्बीजीकरण केंद्राभोवती मोठ्या प्रमाणात घाण, दुर्गंधी आणि अस्वच्छतेचे साम्राज्य पसरले आहे. यामुळे स्थानिक नागरिकांसह जवळील शाळेत ये-जा करणाऱ्या पालकांकडून तीव्र संताप व्यक्त होत आहे. पालिकेच्या या केंद्रातील दुर्लक्षामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

शहरातून भटके श्वान निर्बीजीकरणासाठी या केंद्रात आणले जातात. आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत येथे रोज श्वानांचे निर्बीजीकरण केले जाते; मात्र नागरिक वारंवार तक्रारी करूनही केंद्राच्या परिसरातील स्वच्छतेकडे सातत्याने दुर्लक्ष होत आहे.

### मृत श्वान जंगलात फेकल्याचा गंभीर आरोप

निर्बीजीकरणाच्या प्रक्रियेदरम्यान एखादा श्वान दगावल्यास त्याचा मृतदेह शेजारच्या जंगलात फेकून दिला जात असल्याचा गंभीर आरोप स्थानिकांनी केला आहे. त्यामुळे परिसरात तीव्र दुर्गंधी प्रचंड वाढली आहे. विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात

बदलापूरमध्ये मुंबई उपनगरांतून स्थलांतरित झालेली अनेक कुटुंबे या परिसरात राहत आहेत. मोठ्या गृहसंकुलांमध्ये राहणाऱ्या या रहिवाशांचे दैनंदिन जीवन दुर्गंधी, घाण आणि अस्वच्छतेमुळे त्रस्त झाले आहे. शाळेजवळच घाण आणि कुजण्याचा वास पसरत असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची भीती पालकांनी व्यक्त केली आहे.

### नागरिकांची मागणी

परिसराची त्वरित स्वच्छता करावी, मृत प्राण्यांच्या विल्हेवाटीसाठी शास्त्रशुद्ध व्यवस्था उभी करावी, निर्बीजीकरण केंद्राच्या कामकाजावर योग्य देखरेख ठेवावी, अशा मागण्या नागरिकांनी पालिका प्रशासनाकडे केल्या आहेत.

# उद्या ठाण्यातील काही प्रभागांत पाणी नाही

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे (24)** : ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील वागळे प्रभाग समिती व लोकमान्य सावरकर नगर प्रभाग समिती अंतर्गत इंदिरानगर संप येथे पाणीपुरवठा करण्यासाठी अलीकडच्या काळात 1168मि.मी. व्यासाची जलवाहिनी टाकण्यात आलेली आहे. ही जलवाहिनी कार्यान्वित करण्याकरिता इंदिरानगर नाका येथे 750मि.मी. व्यासाच्या जलवाहिनीवर व्हॉल्व्ह बसविण्याचे काम करणे आवश्यक आहे. परिणामी बुधवार दिनांक 26/11/2025 रोजी सकाळी 9.00 ते गुरूवार दिनांक 27/11/2025 रोजी सकाळी 9.00 वाजेपर्यत एकूण 24 तास पाणी पुरवठा बंद राहणार आहे. सदर शटडाऊन कालावधीत ठाणे महापालिकेअंतर्गत इंदिरानगर जलकुंभ, श्रीनगर जलकुंभ, वारलीपाडा जलकुंभ, कैलासनगर रेनो टँक, रुपादेवी जलकुंभ, रुपादेवी रेनो टँक, रामनगर जलकुंभ, येऊर एअर फोर्स जलकुंभ, लोकमान्य जलकुंभ अंतर्गत परिसर आदी भागांचा पाणी पुरवठा 24 तासांसाठी पूर्णपणे बंद राहणार आहे. पाणीपुरवठा सुरू झाल्यानंतर पुढील 1 ते 2 दिवस कमी दाबाने पाणीपुरवठा होईल याची नोंद नागरिकांनी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# भविष्यवेध



मंगळवार

२५ नोव्हेंबर २०२५

**मेष**
कौटुंबिक वातावरण उत्तम राहील. आरोग्य उत्तम राहील. मनोरंजनावर खर्च होईल. कलाक्षेत्रातील व्यक्तींच्या कामात स्थिती सुखद राहील. नवीन करार होतील.

**वृषभ**
आरोग्य उत्तम राहील. महत्वाच्या कामांमध्ये सुरळीतरीत्या सहयोग मिळेल. कौटुंबिक वातावरण आनंदाचे राहील. मान-सन्मानात इच्छानुरूप वाढ होईल.

**मिथुन**
प्रेम संबंधांमध्ये स्थिती होकारात्मक राहील. मित्रांच्या मदतीने कार्ये पूर्ण होतील. दिवस आनंदात व्यतीत होईल. राजकीय कार्ये होतील.

**कर्क**
कौटुंबिक वातावरण उत्तम राहील. पत्नीपासून लाभ मिळेल. कौटुंबिक विषयांमध्ये सहयोग द्यावा लागू शकतो. शत्रू पराभूत होतील.

**सिंह**
व्यापार-व्यवसायात सुखद स्थितीचे वातावरण राहील. वैवाहिक सुख वाढेल. नोकरपेशा व्यक्तींसाठी काळ चांगला आहे. आरोग्याच्या दृष्टीने काळ अनुकूल आहे.

**कन्या**
कौटुंबिक विषयांमध्ये वेळ चांगला जाईल. व्यापार-व्यवसायात स्थिती अनुकूल राहील. मित्रांचा आधार घेऊन कार्य करा. व्यापार-व्यवसायात स्थिती नरम-गरम राहील.

**तुळ**
प्रवास काळजीपूर्वक करा.काहीकाळ कठीण गेल्यानंतर यश मिळेल. कौटुंबिक विषयांमध्ये वेळ अनुकूल राहील. वैवाहिक जीवनात वातावरण मधुर राहील.

**वृश्चिक**
आपल्या करीयरमधील ज्या ध्येयाची पूर्ती आपणास करायची आहे ते लक्ष्य निर्धारीत करा.आरोग्य उत्तम राहील. न्यायसंबंधी विषयांमध्ये यश मिळेल.

**धनु**
आरोग्य उत्तम राहील. व्यापार-व्यवसाय सुरळीत राहील. मान-सन्मानात वाढ होईल. आपला विधायक दृष्टीकोण इतरांबरोबर समन्वय साधण्यात मदत करतो.

**मकर**
आपल्या क्रोधावर संयम ठेवा आणि सहकाऱ्यांबरोबर वादाची स्थिती टाळा. महत्वपूर्ण कार्यांमध्ये यश मिळेल. आर्थिक नुकसानीची शक्यता आहे.

**कुंभ**
आपली बेपर्वाई आपणासमोर अनपेक्षित प्रश्न उभे करेल. धार्मिक भावना वाढेल. सामाजिक कार्यांमध्ये अनुकूल सहयोग मिळेल व सन्मान वाढेल.

**मिन**
राजकीय व्यक्तींसाठी स्थिती संतोषदायक राहील. संपत्तीच्या खरेदी-विक्रीसाठीही उत्तम दिवस. कार्य योग्य वेळी पूर्ण करण्यासाठी कठोर श्रम करावे लागेल.

# सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा कायापालट होणार
## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आश्वासन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबईतील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था ढासळली आहे. रेल्वेमध्ये प्रचंड गर्दीची समस्या असून हजारो प्रवासी दररोज रेल्वेच्या दरवाजात उभे राहून लोंबकळत प्रवास करतात. दुसऱ्या बाजूला बसने प्रवास करणंही तितकंच अवघड आहे. वाहतूक कोंडीमुळे बसेस कासवगतीने धावत असतात. मात्र, आता मुंबईतील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा कायापालट होणार असल्याचं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलं आहे.

भाजपाच्या युथ कनेक्ट या मोहिमेअंतर्गत फडणवीस यांनी मुंबईतील तरुणांशी संवाद साधला. वरळीतील एनएससीआय डोम येथे तरुणांशी बातचीत करत असताना ते म्हणाले, "मुंबईत अनेक रस्ते बांधले जात असून काही रस्त्यांना समांतर रस्ते, काही ठिकाणी नवे पूल उभारले जाणार आहेत. तर, काही ठिकाणी भूयारी मार्गांचं जाळं तयार केलं जात आहे. यासह आम्ही उपनगरीय रेल्वेचा कायापालट करणार आहोत."

### वातानुकूलित ट्रेनचं तिकीट किती असणार?

**"आम्ही मुंबई लोकलचे सगळे डबे वातानुकूलित करत आहोत. तसेच या लोकलचे सर्व दरवाजे आपोआप बंद होतील. त्यामुळे कोणीही लोंबकळत प्रवास करू शकणार नाही. मला इथे एक गोष्ट सांगायची आहे की आम्ही मेट्रोइतकीच सुंदर लोकल ट्रेन मुंबईकरांना देणार आहोत. मात्र, ते करत असताना द्वितीय श्रेणी डब्याचं तिकीट एक रुपयाने देखील वाढवणार नाही. आत्ताचा जो तिकीट दर आहे त्याच दराने आम्ही मुंबईकरांना वातानूकुलित ट्रेनचं तिकीट देणार आहोत."**

### मुंबई लोकलचा कायापालट करणार : मुख्यमंत्री

मुख्यमंत्री म्हणाले, "मुंबई उपनगरीय रेल्वे ही मुंबईकरांची लाईफलाईन आहे. दररोज ९० लाख लोक या लोकलने प्रवास करतात. परंतु, लोकलमध्ये इतकी गर्दी असते की खरा मुंबईकरच या रेल्वेने प्रवास करू शकतो. बाहेरचा माणूस या लोकल ट्रेनमध्ये प्रवेश सुद्धा करू शकत नाही. या लोकलचा विकास करणं आवश्यक आहे. त्यामुळे आम्ही विचार केला की सुंदर अशी मेट्रो मुंबईकरांना दिल्यानंतर आता लोकल रेल्वेचा कायापालट करणं आवश्यक आहे."

देवेंद्र फडणवीस म्हणाले, "आम्ही मुंबईत वॉटर टॅक्सी सेवा देखील सुरू करत आहोत. मुंबई-अलिबाग रो-रोच्या धर्तीवर मुंबईत वॉटर टॅक्सी सुरू होतील. वॉटर टॅक्सीचं मोठं जाळं तयार केलं जाणार आहे. त्यामुळे नवी मुंबई विमानतळावर उतरल्यानंतर प्रवासी वॉटर टॅक्सीने गेट वे ऑफ इंडियाला जाऊ शकतात."

ठाणे महापालिकेची निवडणूक जानेवारी महिन्यात ?

# निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसेना पदाधिकाऱ्यांची आनंदआश्रम येथे बैठक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**ठाणे :** ठाण्यातील बीएसयुपी योजनेतील सदनिकाधारकांना एक टक्के मुद्रांक शुल्कात सवलत देऊन प्रतिदस्त १०० रुपये आकारण्याच्या निर्णयाचे श्रेय घेण्यावरून शिवसेना (शिंदे गट) आणि भाजपच्या स्थानिक नेत्यांचा वाद पोलिस ठाण्यापर्यंत पोहचला. यानिमित्ताने ठाणे महापालिका निवडणुकांमध्ये युती होणार की नाही, याविषयी चर्चा रंगली आहे. असे असतानाच, शिवसेना (शिंदे गट) खासदार नरेश म्हस्के यांनी पालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसेना पदाधिकाऱ्यांची बैठक आनंदआश्रम येथे बैठक घेऊन महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चा केली. तसेच त्यांनी महायुतीबाबत बैठकीत महत्वाचे विधान केले आहे.

ठाणे महापालिकेची निवडणूक जानेवारी महिन्यात होण्याची शक्यता आहे. या निवडणुकीसाठी पालिका प्रशासनाने प्रभाग रचना अंतिम करण्याबरोबरच आरक्षण सोडत प्रक्रियाही उरकली आहे. त्याचबरोबर प्रारूप मतदार याद्याही पालिका प्रशासनाने प्रसिद्ध केल्या आहेत. असे असतानाच निवडणुकीच्या तोंडावर सत्ताधारी पक्षातील शिवसेना (शिंदे गट) आणि भाजपच्या स्थानिक नेत्यांमध्ये शीत युद्ध सुरू असून पालिका परिसरातील प्रभागात या दोन्ही मित्र पक्षातील वाद पोलीस ठाण्यापर्यंत पोहचला होता. ठाण्यातील बीएसयुपी योजनेतील सदनिकाधारकांना एक टक्के मुद्रांक शुल्कात सवलत देऊन प्रतिदस्त १०० रुपये आकारण्याच्या निर्णय राज्य शासनाने घेतला असून या निर्णयाचे श्रेय घेण्यावरून शिवसेना (शिंदे गट) आणि भाजपच्या स्थानिक नेत्यांचा वाद रंगला होता. भाजपचे माजी नगरसेवक नारायण पवार यांनी कानशिलात लगावत जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप शिंदे गटाचे उपविभागप्रमुख महेश लहाणे आणि शाखाप्रमुख हरेश महाडिक यांनी केला होता. तर, पवार यांनी आरोप फेटाळून लावले होते. यावरून दोन्ही पक्षातील स्थानिक नेत्यांमधील वाद चव्हाट्यावर आले होते. यानिमित्ताने ठाणे महापालिका निवडणुकांमध्ये युती होणार की नाही, याविषयी चर्चा रंगली असतानाच, शिवसेना (शिंदे गट) खासदार नरेश म्हस्के यांनी पालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली.

# उरण : महायुतीत बिघाडी
## भाजपा, महाआघाडी आणि शिंदे गटात तिरंगी लढत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उरण :** नगर परिषदेसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शुक्रवारच्या शेवटच्या दिवशी शिंदे सेनेच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार रूपाली ठाकूर यांनी माघार न घेतल्याने उरणमध्ये महायुतीत येथे बिघाडी झाल्याचे चित्र आहे. ठाकूर यांच्या उमेदवारीमुळे आता भाजपा, महाविकास आघाडी आणि शिवसेना बाळासाहेब ठाकरे (शिंदे गट) अशी तिरंगी लढत होणार हे स्पष्ट झाले आहे. नगरसेवक पदासाठी आलेल्या अर्जापैकी तीन अपक्ष उमेदवारांनी तर नगराध्यक्ष पदासाठी दाखल अर्जापैकी एका अपक्ष उमेदवाराने अर्ज मागे घेतला. उरण नगर परिषदेच्या निवडणूक रिंगणात आता भाजपच्या उमेदवार शोभा कोळी- शहा, महाविकास आघाडीचा घटक पक्ष असलेल्या शरदचंद्र पवार पक्षाच्या उमेदवार भावना घाणेकर, (शिंदे गट) यांच्या उमेदवार रूपाली ठाकूर व एक अपक्ष उमेदवार यांच्यात लढत होणार आहे. उरण नगर परिषदेची सदस्य संख्या (नगरसेवक पदे) २१ आहे. त्यासाठी एकूण ४९ उमेदवारी अर्ज आले आहेत. यात भाजपा २१, महाविकास आघाडी २१, शिवसेना शिंदे गट ५ तर वंचित बहुजन आघाडी आणि आरपीआयचा प्रत्येकी एक उमेदवार निवडणूक लढत आहे. उरण नगर परिषदेत गेली अनेक वर्षे शिवसेना-भाजपा युतीची सत्ता होती. मात्र २०१६ मध्ये युतीत फूट पडली. त्यामुळे २०१६ च्या निवडणुकीत भाजपा विरोधात अखंड शिवसेना व कॉंग्रेस, राष्ट्रवादी आणि शेतकरी कामगार पक्ष अशी तिरंगी लढत झाली होती. यात भाजपाने आघाडी घेत स्वबळावर नगराध्यक्षपद व १८ नगरसेवकांपैकी १३ जागा जिंकल्या होत्या. तर शिवसेनेला अवघ्या ५ जागांवर समाधान मानावे लागले होते. त्यानंतर २०२२ मध्ये मात्र शिवसेनेत फूट पडली. त्यामुळे २०२४ च्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत भाजप-शिंदे गट हे दोन्ही पक्ष एकत्र होते. मात्र शिवसेना फुटीचा उरण शहरात कोणताही परिणाम झाला नव्हता.

# झोपडपट्टीमुक्त पनवेलसाठी राज्यकर्त्यांच्या हस्तक्षेपाची गरज

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पनवेल :** पनवेल झोपडपट्टीमुक्त करण्यासाठी महापालिका प्रशासनाने पुन्हा एकदा सरकारसमोर ठाम भूमिका मांडत रेंटल हाऊसिंग योजनेमधील ७०८९ तयार घरे त्वरित हस्तांतरित करण्याची मागणी केली आहे. एमएमआरडीएची महापालिकेच्या हद्दीलगत असणारी ही घरे ताब्यात मिळावीत म्हणून दोन आठवड्यांपूर्वी महापालिका आयुक्तांनी नगरविकास विभाग - १ चे अप्पर सचिव यांना पत्र दिले होते प्रशासनकर्त्यांसोबत राज्यकर्त्यांनी या मागणीकडे लक्ष दिल्यास पनवेल झोपडपट्टीमुक्त होऊ शकेल.


### 13 वेळा पत्र पाठवूनही घरांच्या हस्तांतरणास एमएमआरडीएकडून नकार

महापालिका क्षेत्रातील झोपडपट्टीधारकांच्या सर्वेक्षणात पनवेल शहरात एकूण ७१८६ झोपड्या असल्याचे स्पष्ट झाले आहे. विविध शासकीय, सिडको, एमआयडीसी व रेल्वेच्या जागांवर या झोपड्या वसल्या आहेत. विविध विकास प्रकल्प, मार्गांचे रुंदीकरण, तलाव सुशोभीकरण, रेल्वे स्टेशनकडे जाणारे रस्ते आदी कामांना या झोपडपट्ट्या अडथळा ठरत असल्याने आयुक्तांनी या झोपडपट्टीतील रहिवाशांच्या 'तातडीची स्थलांतराची गरज' असल्याचे म्हटले आहे.

२०१८ पासून महापालिकेने १३ वेळा पत्र पाठवूनही एमएमआरडीएकडून घरांच्या हस्तांतरणास नकार मिळत असल्याने राज्यकर्त्यांनी तातडीने हस्तक्षेप करणे गरजेचे आहे. अनेक वर्षे वापराविना पडलेल्या ही घरे जीर्ण होत आहेत. शासनाच्या संपत्तीचा अपव्यय होत आहे. झोपडपट्टीवासीयांपैकी इच्छुकांना तरी घरे देण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी निर्णय घ्यावा अशी मागणी पत्राद्वारे करण्यात आली आहे.

# उल्हासनगरात दहशत माजवणारा गुंड अक्षय गायकवाड उर्फ बाबू पोलिसांच्या तावडीत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**कल्याण** - मागील अनेक वर्ष उल्हासनगर शहरात दहशत माजवून कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करणारा, विविध पोलीस ठाण्यात एकूण २३ गुन्हे दाखल असलेला अक्षय सुरेश गायकवाड उर्फ बाबू या कुख्यात गुंडाला हिललाईन पोलिसांनी रविवारी पहाटे अटक केली. बाबूच्या गुंडगिरीमुळे उल्हासनगरचे नागरिक, व्यापारी, किरकोळ विक्रेते त्रस्त होते. त्याच्या अटकेने शहरवासियांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे.

गेल्या एप्रिलमध्ये बाबूने एका तरूणावर हल्ला करून त्याला जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला होता. त्यानंतर बाबू फरार झाला होता. पोलीस त्याचा शोध घेत होते. त्याच्यावर हिललाईन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होता. बाबू उल्हासनगरमध्ये आल्याची गुप्त माहिती दोन दिवसापूर्वी मिळाल्यावर हिललाईन पोलिसांनी सापळा रचून त्याला रविवारी मध्यरात्रीच्या सुमारास अटक केली.

फरार असलेला कुख्यात गुंड बाबू उल्हासनगर शहरात रात्रीच्या वेळेत फिरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. पोलिसांनी त्या माहितीची खात्री केली. तेव्हा त्यांना बाबू शहरात आला असल्याचे समजले. अनेक गुन्ह्यात हवा असलेला बाबूला अटक करण्याची हीच वेळ आहे असा विचार करून पोलीस उपायुक्त सचिन गोरे, हिललाईन पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप शिवले, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सिध्देश्वर कैलासे यांच्या मार्गदर्शनाखाली साहाय्यक पोलीस निरीक्षक दत्तात्रय सानप, पोलीस उपनिरीक्षक संग्राम मालकर, अंकुश सुरेवाड, अविनाश सुर्वे यांच्या पथकाने गुप्तता बाळगून रविवारी पहाटे बाबू राहत असलेल्या त्याच्या घरावर छापा टाकण्याची तयारी केली.

रविवारी पहाटे उल्हासनगरमधील बाबूच्या घराला हिललाईन पोलिसांनी वेढा दिला. एका पोलिसाने त्याच्या घराच्या दरवाजात जाऊन टकटक केली. दरवाजा उघडताच पोलिसांनी लावलेल्या सापळ्यात बाबू अडकला. आपण पोलिसांच्या जाळ्यात अडकलो आहोत हे समजताच त्याने पळण्याचा प्रयत्न केले. पण, चारही बाजुने पोलीस पाहून तो नरमला. अलगत पोलिसांच्या तावडीत सापडला.

बाबूच्या सततच्या त्रासाला कंटाळलेल्या व्यापारी, नागरिकांनी पोलिसांनी बाबूला कायमस्वरूपी तडीपार करण्याची मागणी सुरू केली आहे. कुख्यात बाबू गुंडावर हिललाईन पोलीस ठाण्यात एकूण सात, शिवाजीनगर पोलीस ठाण्यात एकूण आठ, विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यात तीन, मध्यवर्ति पोलीस ठाण्यात एक, उल्हासनगर, कोळसेवाडी पोलीस ठाण्यात एक गुन्हा असे एकूण २३ गुन्हे दाखल आहेत.

पोलिसांनी त्याला न्यायालयात हजर केले. न्यायालयान त्याला दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. बाबुच्या अटकेमुळे त्याच्या साथीदारांच्या अटकेचा मार्ग मोकळा झाला आहे. तसेच, त्याच्यावरील २३ गुन्ह्याचा तपास सुरू करणे पोलिसांना सहज शक्य होणार आहे.

# शहापूर पाठोपाठ नवी मुंबईतही शिधाजिन्नसांची अवैध खरेदी-विक्री



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई :** ठाणे जिल्ह्यातील महापे एमआयडीसी औद्योगिक परिसरात शासन नियंत्रित दरातील शिधाजिन्नसांची मोठ्या प्रमाणावर अवैध खरेदी-विक्री सुरू असल्याच्या माहितीवरून नागरी पुरवठा विभागाच्या फिरत्या पथकाने गुरुवारी (२० नोव्हेंबर) रात्री कारवाई केली. कारवाईदरम्यान, रेशनिंगचा गहू-तांदुळ असा मिळून एकूण ४ लाख ६९ हजार २१३ रुपयांचा मुद्देमाल आणि एक टेम्पो जप्त करण्यात आला. या प्रकरणी चार जणांविरुद्ध रबाळे एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

मे. सिमोज इंटरप्रायझेस या औद्योगिक युनिटमध्ये शासन नियंत्रित दरातील धान्याची अवैध साठवणूक केली जात असल्याची माहिती नागरी पुरवठा विभागाला मिळाली होती. त्यानुसार नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा कार्यालयाच्या फिरत्या पथकाने रात्री सुमारे १० वाजता परिसरात धाड टाकली. मिलच्या कंपाऊंडमध्ये रॅम्पवर उभ्या असलेल्या टाटा इंट्रा वाहनामधून धान्य उतरवण्याच्या तयारीत दोन जण असल्याचे आढळले. चौकशीत त्यांची नावे पिंटू रामप्रसाद कोरी (टेम्पो चालक) आणि सचिन पनवाल (हमाल) अशी समोर आली. तर वाहनामधील गोण्यांमध्ये पलटी केलेल्या रेशनिंगचा गहू-तांदूळ असल्याचे त्यांनी सांगितले.

वाहनाची तपासणी केली असता ५० किलो वजनाच्या ४१ गोण्या गहू, ३० किलो वजनाच्या ९ गोण्या गहू, ५० किलो वजनाच्या २१ गोण्या तांदूळ आणि ३० किलो वजनाच्या ५ गोण्या तांदूळ असा मोठा साठा आढळून आला. हा सर्व माल शासनाच्या रेशनिंग दुकानेतून पलटी करून काळाबाजारत विक्रीसाठी आणल्याची पथकाला खात्री पटली. वाहनचालक पिंटू कोरी याने हा माल अँटॉप हिल परिसरातून आणल्याची कबुली दिली. पुढील विक्रीसाठी मे. सिमोज इंटरप्रायझेसचे मालक शिवलाल गेहलोत व राजन सिंग यांच्याकडे माल पोहोचवला जात असल्याचेही तपासात स्पष्ट झाले. वाहनमालक आशिष पमिजा याचेही या व्यवहारात थेट सहभागी असल्याचे समोर आले.

या गुन्ह्यातील सर्व मुद्देमाल जप्त करण्यात आला असून जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ नुसार चौघांवर कारवाई करण्यात आली आहे. रबाळे एमआयडीसी पोलिस ठाण्यात याबद्दलचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली असून, शिधाजिन्नसांचा काळाबाजार रोखण्यासाठी अशा कारवाया सातत्याने सुरू राहतील, असे नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा विभागाचे निरीक्षक चंद्रकांत डांगे यांनी स्पष्ट केले आहे.






सफाई कर्मचाऱ्यांची अनुपस्थिती, अपुरा पाणीपुरवठा आणि प्रशासनाचे दुर्लक्ष

# वसई पंचायत समितीत स्वच्छतेचे तीन तेरा !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
**प्रतिनिधी**

**वसई:** वसई पंचायत समिती कार्यालयातील स्वच्छतागृहांची दुरवस्था झाली असून, सफाई कर्मचाऱ्यांची अनुपस्थिती, अपुरा पाणीपुरवठा आणि प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे नागरिक व कर्मचाऱ्यांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. विशेषतः महिला कर्मचाऱ्यांची यामुळे मोठी अडचण झाली आहे. तर दुसरीकडे पंचायत समिती कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावरच वाहनांची पार्किंग केली जात असल्यामुळे नागरिकांना ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

वसई पश्चिमेत तहसील कार्यालयासमोर वसई पंचायत समितीचे कार्यालय आहे. पण, कार्यालयाला गेलेले तडे, जीर्ण झालेले बांधकाम यामुळे इमारतीला धोकादायक घोषित करण्यात आले होते. त्यानंतर पंचायत समितीतील विविध आस्थापनांना मुख्य इमारतीच्या मागील बाजूस असणाऱ्या इमारतीत स्थलांतरित करण्यात आले. पण, कार्यालयांमधील जागेची कमतरता, आणि सुविधांचा अभाव यामुळे कर्मचारी त्रस्त झाले आहेत.

तसेच या कार्यालयात स्वच्छतागृहाची योग्य सोय नसल्यामुळे महिला व पुरुष कर्मचाऱ्यांची गैरसोय होत होती. यासाठी चालू वर्षात जुलै ते सप्टेंबरदरम्यान पंचायत समिती कार्यालयाच्या मागच्या बाजूस चार नवी स्वच्छतागृहे उभारण्यात आली. मात्र, नव्याने उभारण्यात आलेल्या स्वच्छतागृहांचीही अवघ्या काही महिन्यातच दुरावस्था झाली आहे.

सफाई कर्मचाऱ्यांचा असलेला अभाव, तसेच अपुरा पाणीपुरवठा यामुळे स्वच्छतागृह अस्वच्छ झाले असून त्याचा वापर करणे कर्मचाऱ्यांना कठीण होऊन बसले आहे. कर्मचाऱ्यांना होणारी गैरसोय लक्षात घेऊन, लवकरच सफाई कर्मचाऱ्यांकडून स्वच्छतागृहांची नियमित सफाई करून घेतली जाईल, असे वसई पंचायत समिती गटविकास अधिकारी छत्तरसिंग राजपूत यांनी सांगितले आहे.



# NCC दिवसानिमित्त जीवनदीप महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

भारताचे माजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी 1948 मध्ये दिल्ली येथे पहिल्या एन सी सी च्या युनिटच्या उभारणीच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान भूषविले हा दिवस ( नोव्हेंबर चा चौथा रविवार ) परंपरेने NCC दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. या दिनाचं औचित्य साधून जीवनदीप महाविद्यालय गोवेली येथे महाविद्यालयाच्या परिसरात फॉरेस्ट राऊंड ऑफिसर. मुरलीधर जागकर आणि सी. टी. ओ. प्रविण भालेराव , एन सी सी कॅडेट यांच्यासमवेत जीवनदीप संस्थेचे अध्यक्ष. रविंद्र घोडविंदे, संचालक. प्रशांत घोडविंदे, प्राचार्य. डॉ. अशोक वाघ, उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे, यांच्या विशेष सहकार्य लाभले. महाविद्यालयात एनसीसीच्या विद्यार्थ्यांची १०७ कॅडेटची बॅच असल्याकारणाने हे ध्यानात घेत प्रत्येक कॅडेटच्या नावे एक वृक्ष लावण्यात आला आणि हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पूर्णत्वास नेण्यात आला.

# मुरबाड मध्ये बालविवाहाचा घाट
## जिल्हा प्रशासनाच्या सतर्कतेने अनर्थ टळला

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
**बातमीदार**

**ठाणे** - घरची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने आई वडिलांनीच आपल्या दोन अल्पवयीन मुलींच्या बालविवाहाचा घाट घातल्याची मुरबाड येथील घटना उघडकीस आली आहे. पुणे येथील चाईल्ड हेल्पलाईन येथे याबाबतची माहिती मिळताच त्यांनी जिल्हा प्रशासनाला याबाबत अवगत केले. यानंतर सूचना मिळताच जिल्हा बाल संरक्षण अधिकारी, अंगणवाडी सेविका, ग्रामसेवक यांच्या मदतीने लग्न घरात धाड टाकून सर्व प्रकार थांबवला. याबाबत मुरबाड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून मुलींच्या पालकांना बालकल्याण समिती समोर हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहे.

पुणे येथील चाईल्ड हेल्पलाईनला २३ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी मिळालेल्या माहितीमध्ये, मुरबाड परिसरात १६ वर्षांच्या दोन मुलींचा विवाह होणार असल्याचे जिल्हा प्रशासनाला सांगण्यात आले होते. त्याच दिवशी सायंकाळी हळद समारंभ पार पडणार, तर दुसऱ्या दिवशी विवाहाची तयारी सुरू असल्याची माहिती चाईल्ड हेल्पलाईनला मिळाली.

**मुलींचे वय लक्षात घेता हे प्रकरण गंभीर असल्याचे जाणून चाईल्ड हेल्पलाईनने तातडीने जिल्हा महिला व बाल विकास कार्यालय तसेच जिल्हा बाल संरक्षण कक्ष यांना याबाबत अवगत केले. याबाबतची सूचना मिळताच जिल्हा बाल संरक्षण अधिकारी, अंगणवाडी सेविका, ग्रामसेवक, एमएसव्हीटी सेवा संस्था, पोलीस पाटील तसेच चाईल्ड हेल्पलाईनचे जिल्हा समन्वयक यांनी एकत्रित कारवाईची योजना आखली. संपूर्ण प्रकरणाची नोंद मुरबाड पोलीसात करण्यात आली.**

# परप्रांतीय रिक्षा चालकांची मुजोरी
## राज ठाकरे - अविनाश जाधव यांना अपशब्द

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** पोखरण रोड क्रमांक एक येथील गांधीनगर भागातील एक व्हिडीओ प्रसारित होत आहे. यामध्ये दोन परप्रांतिय रिक्षा चालकांनी भररस्त्यात मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि मनसेचे नेते अविनाश जाधव यांच्याविषयी अपशब्द काढले. तसेच मनसे पक्षाच्या नावाने शिवीगाळ करत येथे 'आमचीचं चालतं' असे म्हटले. या घटनेनंतर मनसेकडून संताप व्यक्त केला जात आहे. रिक्षा चालकाविरोधात गुन्हा दाखल असून पोलिसांनी त्याला अटक केली आहे. पोखरण रोड येथील गांधीनगर या भागातील शिवसेना शाखेजवळ हा प्रकार घडला. यामध्ये दोन रिक्षा चालक गांधीनगर परिसरात धिंगाणा घालताना दिसत आहेत. तसेच, त्यांच्याकडून भर रस्त्यात शिवीगाळ केली जात होती. त्यांनी मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे आणि मनसेचे नेते अविनाश जाधव यांच्याविषयी अपशब्द काढले. तसेच, मनसे पक्षाविषयी आक्षेपार्ह वक्तव्यय केले.

## रोल बॉल क्रिडा स्पर्धेत

# हॉली क्रॉस शाळेतील विद्यार्थिनींची बाजी



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** राज्यस्तरीय शालेय रोल बॉल क्रिडा स्पर्धा ह्या अहिल्यानगर येथे दिनांक 20 नोव्हेंबर ते 22 नोव्हेंबर या कालावधीत पार पडल्या. या मध्ये मुंबई विभागातील 19 वर्षा खालील मुलींच्या संघाने पुणे विभाग संघा विरुद्ध द्वितीय क्रमांक पटकावला. यामधे कल्याणच्या हॉली क्रॉस शाळेतील विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला होता. या स्पर्धेत कल्याणी हिमगिरे (कर्णधार) अनुष्का जाधव, श्रुती जगताप, श्रेया दामोदर, गौरवि माळी, स्वरा काळे, दिव्यांशि कुकरेजा, अंतरा राय, भूमिका शर्मा, तनिष्का मेढे या खेळाडूंचा सहभाग होता. विजयी संघाला हॉली क्रॉस शाळेच्या मुख्याध्यापिका जेसिंथा सुआरेस, तसेच ठाणे जिल्हा रोल बॉल संघटनेचे सचिव प्रताप पगार यांनी शुभेच्छा देत अभिनंदन केले. मुलींच्या संघाला हॉली क्रॉस शाळेचे क्रिडा शिक्षक रविंद्र देसाई यांनी प्रशिक्षण दिले. तसेच संगीता जाधव यांनी व्यवस्थापक म्हणुन काम पाहिले.

# शिवसेनेच्या वतीने महाआरोग्य शिबीर



शिवसेना विजय नगर, आमराई, चिंचपाडा मध्यवर्ती शाखेचे आयोजन


**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याण पूर्वेतील शिव सेना विजय नगर, आमराई, चिंचपाडा, मध्यवर्ती शाखेच्या वतीने आरोग्य धनसंपदा फाउंडेशन आणि साई हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने कल्याण पूर्वेत माजी नगरसेविका माधुरी काळे यांच्या जनसंपर्क कार्यालयात मोफत शस्त्रक्रिया, महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे आयोजन माजी नगरसेविका माधुरी काळे, विभाग समनव्यक महेंद्र एटमे, शिवसैनिक भारती एटमे यांच्यावतीने करण्यात आले.

या शिबिरात मोफत ब्लड प्रेशर, शुगर, हृदयाची ईसीजी चाचणी व एमआरआय सिटीस्कॅन, अल्प दरात, डोळे तपासणी व अल्प दरात चष्मे वाटप तसेच स्त्रियांच्या विविध आजारांवर तज्ञ व अनुभवी डॉक्टरांचा सल्ला व त्यासोबत काही ठराविक औषधे अत्यल्प दरात उपलब्ध करून देण्यात आली.

तर हृदयाची अँजिओग्राफी, कॅन्सर शस्त्रक्रिया, अँजिओप्लास्टी, तिरळेपणाच्या शस्त्रक्रिया, मूत्रमार्ग शस्त्रक्रिया, गर्भ पिशवी दुरुस्ती, डायलिसिस, हर्निया शस्त्रक्रिया, डोळयाच्या सफेद पडद्याची शस्त्रक्रिया, व्हॉल्व रीप्लेसमेंट, हाडांचे फॅक्चर, वायपास, कानाच्या पडद्याची शस्त्रक्रिया, हृदयाला असलेले छिद्र, मणक्याच्या शस्त्रक्रिया, मोतीबिंद शस्त्रक्रिया छाती आणि पोटामधील शस्त्रक्रिया मोफत करण्यात येणार आहेत. शिवसेनेच्या वतीने आयोजित या शिबिराचा प्रभागातील नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घेतला.



# हिंदी चित्रपटसृष्टीतील 'ही-मॅन'

बॉलिवूडचा "ही-मॅन" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या धर्मेंद्र नेहमीच सर्वांसाठी प्रेरणास्थान ठरले. एकेकाळी दिलीप कुमार यांना त्यांचे प्रेरणास्थान मानणारे धर्मेंद्र लवकरच लाखो लोकांसाठी प्रेरणास्थान बनले आणि आज जगभरातील लोक त्यांचे कौतुक करतात. त्यांचा प्रवास खरोखरच प्रेरणादायी आहे. पंजाबमधील एका लहानशा गावात असलेल्या सहेनवालमध्ये जन्मलेल्या धर्मेंद्र यांनी चित्रपटसृष्टीत कोणत्याही गॉडफादरशिवाय एक स्थान निर्माण केले आणि लाखो लोकांसाठी प्रेरणास्थान बनले. धर्मेंद्र यांच्या कठोर परिश्रम, समर्पण आणि प्रतिभेचे हे फळ आहे ज्यामुळे त्यांना डझनभर हिट चित्रपट मिळाले आणि चित्रपटसृष्टीतील त्यांच्या योगदानाबद्दल त्यांना अनेक पुरस्कार आणि सन्मानांनी सन्मानित करण्यात आले. त्यांना पद्मभूषण पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले.

धर्मेंद्र किती शिक्षित होते, त्यांनी कठोर परिश्रम करून किती संपत्ती जमवली, त्यांनी कोणते विक्रम प्रस्थापित केले आणि सहा दशकांहून अधिक काळ काम केल्यानंतर त्यांनी कोणते पुरस्कार जिंकले याबाबत अधिक माहिती आपण घेऊया.

### धर्मेंद्र यांचे शिक्षण आणि खरे नाव

धर्मेंद्र यांचे खरे नाव धर्मेंद्र केवल कृष्ण देओल आहे, परंतु चित्रपटांमध्ये प्रवेश केल्यानंतर ते धर्मेंद्र म्हणून ओळखले जाऊ लागले. त्यांचा जन्म ८ डिसेंबर १९३५ रोजी पंजाबमधील लुधियाना जिल्ह्यातील सहनेवाल गावातील एका जाट शीख कुटुंबात झाला. धर्मेंद्र यांनी त्यांचे प्राथमिक शिक्षण लालटन कलान येथे केले, जिथे त्यांचे वडील केवल कृष्ण हे मुख्याध्यापक होते. त्यानंतर धर्मेंद्र यांनी त्यांच्या इंटरमिजिएट शिक्षणासाठी फगवाडा येथील रामगढिया कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. त्यांनी १२ वी पर्यंत शिक्षण घेतले. त्यांना पुढे शिक्षण घ्यायचे होते, परंतु अभिनयाची त्यांची आवड त्यांना मागे टाकत गेली आणि ते पुढील शिक्षण घेऊ शकले नाहीत.

### धर्मेंद्र यांचे पहिले लग्न आणि चित्रपट कारकीर्द

धर्मेंद्र यांचे दोनदा लग्न झाले आहे. १९ वर्षांचे असताना त्यांचे लग्न प्रकाश कौरशी झाले होते. हे १९५४ मध्ये घडले. तेव्हा त्यांनी चित्रपटांमध्येही प्रवेश केला नव्हता. या लग्नापासून त्यांना सनी देओल आणि बॉबी देओल हे दोन मुलगे आणि अजिता आणि विजेता या दोन मुली झाल्या. त्यानंतर त्यांनी १९८० मध्ये हेमा मालिनीशी लग्न केले. चित्रपटांमध्ये प्रवेश केल्यानंतर, धर्मेंद्र एकत्र काम करत असताना तिच्या प्रेमात पडले. असे म्हटले जाते की धर्मेंद्रने हेमा मालिनीशी लग्न करण्यासाठी इस्लाम धर्म स्वीकारला जेणेकरून त्यांना त्यांच्या पहिल्या पत्नीला घटस्फोट घ्यावा लागू नये. तथापि, धर्मेंद्र यांनी हे नाकारले आहे. धर्मेंद्र यांच्या मागे दोन बायका, ६ मुलं आणि नातवंडं असा परिवार आहे.

धर्मेंद्र यांचे पहिले चित्रपट आणि सलग हिट्स

पहिल्या लग्नानंतर, धर्मेंद्र चित्रपटात करिअर करण्यासाठी मुंबईत गेले. फिल्मफेअर मासिकाचा न्यू टॅलेंट अवॉर्ड जिंकल्यानंतर ते मुंबईत आले. धर्मेंद्र यांनी १९६० मध्ये "दिल भी तेरा हम भी तेरे" या चित्रपटातून अभिनय क्षेत्रात पदार्पण केले आणि मागे वळून पाहिले नाही. त्यांचा पहिला चित्रपट फ्लॉप झाला, परंतु त्यांच्या कारकिर्दीला सुरुवात झाली. त्यानंतर, १९६१ मध्ये धर्मेंद्र यांनी "शोले और शबनम," "अनपढ" आणि "बंदिनी" यासह अनेक हिट चित्रपट दिले. धर्मेंद्रचा करिष्मा मनमोहक होता आणि प्रत्येक चित्रपट निर्माता आणि नायिका त्यांच्यासोबत काम करू इच्छित होती. त्यांनी "शोले", "सीता और गीता", "धर्म वीर", "यादों की बारात", "चरस" आणि "चुपके चुपके" असे अनेक हिट चित्रपट दिले आणि वयाच्या ८९ व्या वर्षीही ते काम करत आहेत. अलिकडेच धर्मेंद्र यांच्या नवीन चित्रपट "इक्कीस" चा ट्रेलर प्रदर्शित झाला आणि त्याला चांगला प्रतिसाद मिळाला. हा चित्रपट लवकरच प्रदर्शित होणार आहे.

### धर्मेंद्र यांना मिळालेले पुरस्कार

धर्मेंद्र यांनी केवळ चित्रपटांमध्ये काम केले नाही तर त्यांनी . भारतीय चित्रपटसृष्टीतील योगदानाबद्दल त्यांना २०१२ मध्ये पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांना राष्ट्रीय पुरस्कार देखील मिळाला आणि फिल्मफेअर जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

### कसं ठेवलं राजकारणात पाऊल ?

2004 साली धर्मेंद्र यांनी भारतीय जनता पक्षाच्या स्विंग इंडिया मोहिमेने प्रेरित होऊन राजकारणात प्रवेश केला. या काळात त्यांनी शत्रुघ्न सिन्हा यांच्यासह भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांची भेट घेतली.हीच भेट त्यांच्या राजकीय कारकिर्दीतील पहिले पाऊल ठरली. भाजपने त्यांना राजस्थानमधील बिकानेर लोकसभा मतदारसंघातून उमेदवार म्हणून नामंकन दिलं. त्यावेळी धर्मेंद्र यांनी काँग्रेसचे उमेदवार रामेश्वर लाल दुडी यांचा जवळजवळ 60 हजार मतांनी पराभव करून निवडणूक जिंकली आणि ते संसदेत पोहोचले.

### नवाज शरीफसुद्धा होते धर्मेंद्रचे चाहते

1935 साली पंजाबात जन्मलेले धर्म सिंह देओल यांचा त्यांच्या नरसाली गावापासून ते मुंबईपर्यंतचा प्रवास हे एक सुंदर स्वप्नंच होतं.

अभिनेते धर्मेंद्र यांचे भारतात तर लाखो चाहते आहेतच. मात्र पाकिस्तानातदेखील त्यांचे असंख्य चाहते आहेत. यात पाकिस्तानचे माजी पंतप्रधान नवाज शरीफ यांचादेखील समावेश आहे.

### धर्मेंद्र यांनी एक किस्सा ऐकवला होता.

तो असा, "जेव्हा नवाज शरीफ भारतात आले होते, तेव्हा माझी त्यांच्याशी भेट झाली होती. नवाज शरीफ म्हणाले होते की त्यांचं कुटुंब कारमधून जात होतं, त्यावेळेस त्यांनी माझ्या घरासमोर त्यांची कार थांबवली होती. त्यांनी त्यांच्या पत्नी आणि मुलांना सांगितलं होतं - पाहा, हे धर्मेंद्र यांचं घर आहे."

### महेश भट्ट यांच्यासाठी धर्मेंद्र यांनी ट्रक ड्रायव्हरकडून कपडे घेतले उधार

धर्मेंद्र त्यांच्या अभिनयासाठी प्रसिद्ध होतेच, तसंच त्यांच्या उदारपणाबद्दलचे किस्सेदेखील प्रसिद्ध होते. नॉट जस्ट अ ही-मॅन' हे पुस्तक लिहिलं आहे. या पुस्तकात धर्मेंद्र यांचे असे अनेक किस्से देण्यात आले आहेत.

या पुस्तकात महेश भट्ट म्हणतात, "दो चोर या चित्रपटाच्या सेटवर मी सहाय्यक म्हणून काम करत होतो. मी नीट सूचना दिल्या नाहीत, त्यामुळे धर्मेंद्र यांचा ट्रक ड्रायव्हरचा पोशाख चित्रीकरण स्थळापासून दूर असलेल्या हॉटेलातच राहिला होता."

"ते दृश्य कोणत्याही परिस्थितीत सकाळी-सकाळीच चित्रीत होणं आवश्यक होतं. नाहीतर निर्मात्याचं मोठं नुकसान झालं असतं. मग मी धर्मेंद्र यांना माझी अडचण सांगितली."

ते पुढे म्हणतात, "धर्मेंद्र यांनी सहानुभुतीनं माझं म्हणणं ऐकून घेतलं. ते उठले, जवळच एक ट्रक ड्रायव्हर होता. ते त्या ड्रायव्हरकडे गेले. धरमजींनी त्या ड्रायव्हरनं घातलेले मळलेले कपडे तात्पुरते त्याच्याकडून घेतले आणि एक ड्रेसमॅननं केलेली चूक त्यांच्या उदारपणानं आणि कल्पनाशीलतेनं झाकून टाकली."

### दिलीप कुमारमुळे निर्माण झाली अभिनयाची इच्छा

धर्मेंद्र यांच्या बालपणाबद्दल बोलायचं, तर त्यांचे वडील लुधियानाजवळच्या सानेवाल गावात गणिताचे शिक्षक होते. तिथे सिनेमा पाहणं ही खूपच दूरची गोष्ट होती.

लहानपणी, एकदा धर्मेंद्र यांनी चोरून दिलीप कुमार यांचा शहीद हा चित्रपट पाहिला. तो 1948 सालचा चित्रपट होता.

धर्मेंद्र म्हणतात की त्या चित्रपटानं आणि दिलीप कुमार यांनी त्यांच्या मनावर जणू काही गारुडच केलं होतं. एकप्रकारे त्याच दिवशी त्यांचं भवितव्य निश्चित झालं होतं.

नशीबानं देखील धर्मेंद्र यांना साथ दिली. 1958 मध्ये फिल्मफेअर मासिकानं एका टॅलंट हंटची घोषणा केली. त्यात बिमल रॉय आणि गुरु दत्त यांच्यासारखे दिग्गज देखील होते.

त्यावेळेस मलेरकोटला मध्ये नोकरी करत असलेले धर्मेंद्र तिथे जान मोहम्मद फोटो स्टुडिओमध्ये गेले. ते म्हणाले की काहीतरी असं करा की मी दिलीप कुमार होईल आणि माझी निवड होईल.

आणि तसंच झालंदेखील. गावातील मुलगा निवडला गेला आणि मुंबईत पोहोचला.

मग सुरू झाली एखाद्या चित्रपटाला साजेशी कहाणी. त्यात भावना होत्या, नाट्य होतं आणि शोकांतिकादेखील होती.

### बिमल रॉय यांचे धर्मेंदू आणि बंदिनी

बिमल रॉय यांनी धर्मेंद्र यांना अभिनयाची पहिली संधी दिली होती. तो चित्रपट होता 'बंदिनी'. बिमल रॉय त्यांना 'धर्मेंदू' म्हणायचे.

अर्थात बंदिनी चित्रपट पूर्ण होण्यास वेळ लागला. या दरम्यान संघर्षाच्या काळात अर्जुन हिंगोरानी यांनी धर्मेंद्र यांना 'दिल भी तेरा हम भी तेरे' या चित्रपटात भूमिका दिली.

1966 मध्ये आलेल्या 'फूल और पत्थर' या चित्रपटानं खऱ्या अर्थानं सोलो हिरो म्हणून धर्मेंद्र यांची ओळख निर्माण झाली. या चित्रपटात एक दृश्य होतं की गुंड, दारुड्याच्या भूमिकेतील धर्मेंद्र त्यांचा शर्ट काढून एक भिकारी आणि विधवेच्या अंगावर टाकतात. त्यावेळेस कोणत्याही हिरोची अशी बॉडी नव्हती. याच चित्रपटात ही-मॅनची पहिली झलक पाहायला मिळाली. याच चित्रपटानं धर्मेंद्र यांना फिल्मफेअरचं पहिलं नामांकनदेखील मिळवून दिलं.

### अमिताभ बच्चन-राजेश खन्ना असूनही हिट

1960 चं दशक येईपर्यंत धर्मेंद्र यशाच्या पायऱ्या चढत होते, मात्र त्यांना मोठ्या स्पर्धेला तोंड द्यावं लागत होतं. 60 च्या दशकाच्या सुरूवातीला जेव्हा धर्मेंद्र यांच्या करियरची सुरूवात होत होती, तेव्हा शम्मी कपूरचा जमाना होता. 1970 चं दशक सुरू होईपर्यंत राजेश खन्ना नावाचं वादळ आलं. तर धर्मेंद्र जेव्हा यशाच्या शिखरावर होते, तेव्हा अमिताभ बच्चन यांनी सर्वांवर गारुड केलेलं होतं.

मात्र या सर्व स्पर्धेतदेखील धर्मेंद्र बहुधा एकमेव अभिनेते होते जे 60 च्या दशकापासून ते 80 च्या दशकापर्यंत हिट मशीनप्रमाणे टिकून राहिले.

### अनुपमामधील कवी आणि सत्यकाम

धर्मेंद्र यांच्या करियरबद्दल बोलायचं, तर 'अनुपमा' आणि 'सत्यकाम' हे माझे आवडते चित्रपट आहेत. ते ऋषिकेश मुखर्जींनी बनवले होते.

1969 मध्ये आलेल्या सत्यकाममध्ये धर्मेंद्र यांची भूमिका वेगळीच होती. स्वातंत्र्यानंतरच्या भारतात, सत्याला सर्वात वरचं स्थान देणारा सत्यप्रिय (धर्मेंद्र) त्याचं सर्वकाही पणाला लावण्याइतका आदर्शवादी असतो.

### चुपके चुपकेतील विनोदी भूमिका

नंतर धर्मेंद्र यांचे 'हकीकत', 'दिल ने फिर याद किया', 'ममता', 'मेरे हमदम मेरे दोस्त' यासारख्या चित्रपट आले. या चित्रपटांमध्ये बिमल रॉय, ऋषिकेश मुखर्जी, चेतन आनंद यांच्यासारख्या दिग्दर्शकांनी त्यांच्या अभिनयाला आणखी पैलू पाडले.

मग आलं 1970 चं दशक, ज्यात धर्मेंद्र यांचं वेगळंच रूप प्रेक्षकांना रुपेरी पडद्यावर दिसलं. त्यात ॲक्शन, रोमान्स, कॉमेडी, असं व्यावसायिक सिनेमात असणारं सर्वकाही होतं. या काळात धर्मेंद्र यांचे 'जीवन मृत्यू', 'सीता और गीता', 'चरस', 'ब्लॅकमेल', 'चुपके चुपके' हे एकापाठोपाठ एक हिट चित्रपट आले.

### धर्मेंद्र आणि अमिताभ

1975 साली शोले प्रदर्शित झाला. या चित्रपटातील वीरूच्या भूमिकेनं तर धर्मेंद्र यांची वेगळीच ओळख निर्माण झाली. तोपर्यंत त्यांची लोकप्रियता शिखरावर पोहोचली होती.

शोलेमधील पाण्याच्या टाकीवर चढण्याचा तो सदाबहार सीन कोण विसरू शकेल.

'व्हेन आय डेड, पोलीस कमिंग..पोलीस कमिंग, बुढिया गोईंग जेल...इन जेल बुढिया चक्की पीसिंग अँड पीसिंग अँड पीसिंग' हे संवाद आजदेखील प्रेक्षकांना पाठ आहेत.

टांगेवाल्या बसंतीबरोबर टांग्यावर रोमान्स करणारा वीरू लोकांना भावला होता. त्यामुळे या चित्रपटानं धर्मेंद्र यांचं स्टारडम प्रचंड वाढलं होतं.

### 'सर्वात देखणा अभिनेता'

धर्मेंद्र ऐन भरात असताना त्यांचा समावेश जगातील सर्वात देखण्या पुरुषांच्या यादीत करण्यात आला होता. धर्मेंद्र यांचे आदर्श होते, दिलीप कुमार. एका कार्यक्रमात दिलीप कुमार म्हणाले होते की जेव्हा ते देवाला भेटतील तेव्हा त्याला विचारतील की देवानं त्यांना धर्मेंद्रसारखं देखणं का बनवलं नाही.

याबद्दल धर्मेंद्र बीबीसीला म्हणाले होते, "मी विचार करतो की लोक म्हणत असतील तर कदाचित खरंच असेल. ते मला ही-मॅन म्हणतात, ग्रीक गॉड म्हणतात. मी माझ्या गुणांमध्येदेखील उणिवा शोधत असतो. माझ्या चाहत्यांच्या मनात माझं जे स्थान आहे, ते मी गमावू नये याचाच मी विचार करतो."

अभिनयानं प्रेक्षकांना भुरळ पाडणारा हा कलाकार नृत्यकौशल्यात मात्र जेमतेमच होता. मात्र तरीदेखील जट पगला यमला दिवाना सारखी त्यांची गाणी अत्यंत लोकप्रिय झाली.

या गाण्याबद्दल धर्मेंद्र बीबीसीला म्हणाले होते, "चित्रपटात मी लोकांसमोर नाचण्यास नकार दिला होता. त्यामुळे माझ्यासाठी आणि रेखासाठी क्रेन आणण्यात आली. मग मी असा खुलली की माझा संकोचच निघून गेला. तुमचा धरम बेशरम झाला."

### हेमा मालिनी आणि धर्मेंद्र यांची प्रेमकहाणी

याच काळात धर्मेंद्र हेमा मालिनीवरच्या प्रेमात आकंठ बुडालेले होते. अर्थात धर्मेंद्र यांचं प्रकाश कौर यांच्याशी आधीच लग्न झालेलं होतं. 1980 साली धर्मेंद्र यांनी ड्रीमगर्ल हेमा मालिनी यांच्याशी लग्न केलं, तेव्हा त्यावरून मोठा वाद निर्माण झाला होता.

लेखक राम कमल मुखर्जी यांनी 'बिऑंड द ड्रीम गर्ल' हे हेमा मालिनी याचं चरित्र लिहिलं आहे. त्यात मुखर्जी यांनी लिहिलं आहे, "1974 मध्ये जितेंद्र आणि हेमा मालिनी यांच्या आई-वडिलांनी दोघांचा विवाह करण्याचा निर्णय घेतला होता...अर्थात तोपर्यंत हेमा मालिनी यांच्या आयुष्यात धर्मेंद्र आले होते."

"धर्मेंद्र यांना जेव्हा या लग्नाबद्दल माहित झालं, तेव्हा ते थेट मद्रासला पोहोचले, जिथे हे लग्न होणार होतं. धर्मेंद्र हेमा मालिनीशी एकांतात बोलले आणि मग ते लग्न झालं नाही."

नंतर धर्मेंद्र चित्रपट निर्मातेदेखील झाले. त्यांनी सनी देओल आणि बॉबी देओल या त्यांच्या मुलांना विजेता फिल्म्ज या बॅनरखाली लाँच केलं.

मुलांना जरी चित्रपटांच्या दुनियेत आणलं तरी मुलींना या क्षेत्रात आणण्यासाठी धर्मेंद्र तयार नव्हते. ईशा आणि अहाना या मुलींनी चित्रपटात काम करावं असं त्यांना वाटत नव्हतं.

लेखक राजीव विजयकर यांनी 'धर्मेंद्र- नॉट जस्ट ए ही मॅन' हे पुस्तक लिहिलं आहे. त्यात ते लिहितात, 1990 ते 2003 पर्यंतच्या कालखंडाला धर्मेंद्र यांच्या करियरमधील रेट्रोग्रेड काळ म्हणता येऊ शकतं. 1999 मध्ये कांति शाह यांचा मुन्नीबाई हा चित्रपट आला होता. या चित्रपटापासून धर्मेंद्र पूर्णपणे बी ग्रेड चित्रपटांचा भाग झाले.

### ॲक्टिंग मेरी महबूबा, कभी यह रूठ जाती है..

वयानुसार धर्मेंद्र ज्याप्रकारे चित्रपटातून आणखी चमकले असते, ते कमीअधिक प्रमाणात होऊ शकलं नाही..

लंडनमध्ये दिलेल्या मुलाखतीत एकदा धर्मेंद्र मला म्हणाले होते, "ॲक्टिंग माझ्यासाठी प्रेमिका आहे, माझं त्यावर प्रेम आहे. ज्याप्रकारे प्रियकर-प्रेयसीमध्ये भांडण होतं...कधी अभिनय रुसतो, तेव्हा मी त्याचं मन वळवतो, कधी मी रुसतो तेव्हा अभिनय माझं मन वळवतं. मात्र मी त्याला सोडलं नाही."

ही खरी गोष्ट आहे की धर्मेंद्रनं अभिनय कधी सोडला नाही. मधून मधून ते त्यांच्या या प्रेयसीला भेटण्यासाठी जात असत आणि भूमिका चांगली असेल तर त्यात त्यांचं ते जुनं रूप, अंदाज पाहायला देखील मिळायचा.

जॉनी गद्दार या चित्रपटात त्यांच्या गँगचे सदस्य वयस्कर धर्मेंद्र यांच्या क्षमतेवर शंका व्यक्त करतात. त्यावेळेस ते म्हणतात - 'इट्स नॉट द एज, इट्स द मायलेज'. म्हणजेच वयावर जाऊ नका, क्षमता लक्षात घ्या. डिसेंबरमध्ये धर्मेंद्र यांचा इक्कीस हा चित्रपट प्रदर्शित होईल तेव्हा या देखण्या, अष्टपैलू अभिनेत्याला त्यांचे चाहते शेवटचं रुपेरी पडद्यावर पाहतील.

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024